मार्गदर्शक
प्रा. डॉ. सुधीर मेश्राम
कुलगुरू

संपादक
डॉ. तुकाराम दौड
विभागप्रमुख, जनसंवाद आणि पत्रकारिता

सहकार्य
सुनील पाटील
जनसंपर्क अधिकारी

GRADE-B(2.88)
NAAC RE-ACREDITTED

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उमवि वार्ता

जळगाव | वर्ष ४ थे | अंक १२ | मे, २०१४ | पाने ८



महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन करतांना कुलगुरू प्रा. सुधीर मेश्राम सोबत कुलसचिव प्रा.ए.एम.महाजन.

## महाविद्यालयीन गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न - कुलगुरू

जळगाव.- गुणात्मक महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षणासाठी सुधारणा करणे ही बाब लक्षात घेवून कुलगुरू प्रा. सुधीर मेश्राम यांनी विद्यापीठ व महाविद्यालये गुणवत्ता सुधार व नियंत्रण समित्यांचे पुर्नगठण करण्यात आले आहे.

धुळे, नंदूरबार, जळगाव या तिन्ही जिल्ह्यातील संलग्नीत महाविद्यालये व प्रशाळा यांची गुणवत्ता सुधार व नियंत्रण समित्या व नियंत्रण कक्ष कार्यान्वीत करण्यात आला आहे. यूजीसी व महाराष्ट्र यांच्याकडून विविध योजनांतर्गत प्राप्त होणारा निधी व अनुदान याचा विनियोग कशा प्रकारे करण्यात आला व शैक्षणिक कामकाज याचा आढावा, परीक्षा विषयक कामकाज, अभ्यासक्रमांची पुर्नरचना व रोजगाराभिमुख शिक्षण यांचा आढावा घेण्यात येत असून विविध समित्यांचे अहवाल विद्यापीठाला प्राप्त झाले आहे. प्रा.पी.पी.पाटील अध्यक्ष विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा, प्राचार्य डॉ. पी.एच. पवार अध्यक्ष जळगाव जिल्हा कार्यक्षेत्र जळगाव, भुसावळ, रावेर, यावल, मुक्ताईनगर, प्राचार्य डॉ. डी. एल. तोरणे अध्यक्ष जळगाव जिल्हा समतिचे कार्यक्षेत्र अमळनेर, पारोळा, एरंडोल, धरणगाव चोपडा, प्राचार्य डॉ. डी.आर.पाटील समितीचे कार्यक्षेत्र चाळीसगाव, पाचोरा, भडगाव, जामनेर, बोदवड. प्राचार्य डॉ. प्रभा व्ही रामैय्या अध्यक्ष धुळे जिल्हा समितीचे कार्यक्षेत्र शिरपूर, शिंदखेडा, प्रा. एल.ए. पाटील जिल्हा समितीचे कार्यक्षेत्रधुळे शहर. *(पान ३ वर)*

## २२ वा पदवीप्रदान समारंभ २१ रोजी

जळगाव - उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा २२ वा पदवीप्रदान समारंभ बुधवार दि. २१ मे रोजी दुपारी २.३० वाजता संपन्न होत आहे.

या दीक्षांत समारंभासाठी माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम व अणु ऊर्जा प्रकल्पाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर व कुलगुरू डॉ. सुधीर मेश्राम यावेळी उपस्थीत राहतील. या समारंभात ३० हजार १४१ स्नातकांना मान्यवरांच्या हस्ते पदव्या देवून गौरविण्यात येणार आहे. यामध्ये कला व ललित कला शाखेचे २४७, मानसनिती व समाजविज्ञान शाखा चार हजार ७१३, विज्ञान विद्याशाखा पाच हजार ४३७ स्नातक, विधी विद्याशाखा ४५३, वैद्यक व औषधनिर्माण शास्त्र शाखा ५३२ स्नातक, अभियांत्रिकी विद्याशाखा ४४९८ स्नातक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा सहा हजार १९९ स्नातक आणि शिक्षणशास्त्र विद्याशाखा तीन हजार ६२ स्नातकांचा समावेश आहे. तसेच १३७ पीएचडी धारकांना सन्मानीत करण्यात येणार आहे.

## विद्यार्थी भवनाच्या कोनशिलेचा अनावरण समारंभ २१ रोजी

जळगाव - अंतरी पेटवू ज्ञानज्योत असे दिमाखात म्हणून घेणाऱ्या विद्यापीठातर्फे उभारण्यात येणाऱ्या पर्यावरणपुरक विद्यार्थी भवनाच्या कोनशिलेचे अनावरण दुपारी २.१५ वाजता माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. प्रशासकीय इमारती समोरील बसस्थानका नजीकच्या मोकळ्या जागेत ही इमारत येत्या दोन वर्षात उभी करण्यात येणार आहे. संपूर्ण इमारत ही पर्यावरणपूरक राहील यासाठी ६९३ लाख रूपए खर्च अपेक्षीत आहे. तीन मजली इमारतीचे क्षेत्रफळ ५८ हजार चौरस फूट आहे. यात प्रशासकीय कार्यालय, ५०० क्षमतेचे सेमिनार हॉल, *(पान ५ वर)*

## आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षणाचे दालन खुले

जळगाव - खान्देशातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक दालन खुले करुन देणाऱ्या सामंजस्य करारावर जपान येथील तोकुशिमा विद्यापीठ आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या वतीने दिनांक ०४ मे रोजी स्वाक्षरी करण्यात आली. या करारामुळे डबल डिग्री प्रोग्राम, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अदान-प्रदान, संयुक्त संशोधन प्रकल्प असे काही महत्वपूर्ण कार्यक्रम हाती घेतले जाणार आहेत.

रविवारी कुलगुरु प्रा.सुधीर मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. तोकुशिमा विद्यापीठ जपान यांच्या वतीने अधिष्ठाता व आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक प्रा.तोशिहिरो मोरीगा यांनी व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे कुलसचिव प्रा.ए.एम.महाजन यांनी *(पान ७ वर)*

## संपादकीय....

# उमविची जैवतंत्रज्ञान क्षेत्रात वाटचाल

भारत हा कृषी प्रधान देश आहे. आपल्या लोकसंख्येच्या ७० टक्यांपेक्षा ही जास्त लोक विविध प्रकारे शेतीवर अवलंबून आहेत. विशेषत: लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने आपले महाराष्ट्र राज्य हे संपूर्ण भारतात तिस-या क्रमांकावर आहे. आपल्या देशातील बहुतांश शेतक-यांना दैनदिन गरजा पूर्ण करण्यासाठी शेतीवर अवलंबून रहावे लागते. पारंपारिक पध्दतीने शेती करतांना उत्पादन खर्चाची तोडमिळवणी करतांना शेतकऱ्यांची दमछाक होते. उमवि मध्ये जैविक तंत्रज्ञान विभागाने प्रगतीचे पाऊल उचलले आहेत. जैवतंत्रज्ञान विभागातील संशोधक विद्यार्थी व अद्यावत प्रयोग शाळेच्या मदतीने जळगांव पाणी पुरवठा विभागातील पाण्याचे नमुने तपासण्याचे काम उमवितील जैवतंत्रज्ञान विभागाने केले. पिवळया पाण्याची समस्या कशी दूर करता येईल या संदर्भातील मार्गदर्शन जळगांव मनपाला केले. हे अत्यंत महत्वाचे आहे. लॅब टू लॅण्ड प्रकल्पाअंतर्गत कृषी क्षेत्राची माहिती पोहचविली जात आहे. याचे श्रेय मा. कुलगुरू महोदय प्रा. डॉ. सुधीर मेश्राम यांच्याकडे जाते. भारतातील ७० टक्के शेती पावसावर अवलंबून आहे. अन्नधान्य उत्पादन तंत्रज्ञानाला आत्मसात करुन नैसर्गिक पावसावर पिकणाऱ्या शेतीची उत्पादकता ही देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने परिणामकारक ठरूशकते. परंतु सर्व सामान्य भारतीय शेतकरी गारपीट ग्रस्त असल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती फारशी समाधानकारक नाहीत. नुकताच शिक्षकेतर कर्मचारी यांनी एक दिवसांचा पगार शासनाकडे सुपूर्द केला आहे. गरजू, शेतकऱ्यांना आर्थिक मदत व्हावी व अस्मानी संकटापासून जगण्याचे धैर्य मिळावे या मानवतावादी दृष्टीकोनातून उमविने आर्थिक सहायता निधी दिला. मानवाने मानवाला आर्थिक संकटातून आपल्या बांधवांना सावरणे व त्यांना उभे करणे हे मानवी समाजाचे उत्तरदायित्व असते. खान्देश प्रदेशातील नंदूरबार, धुळे, जळगाव जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांची जैविक संपदा गारपीटमध्ये नष्ट झाली. आधुनिक युगात जैवीक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन व्यावसायिक दृष्टीकोन अंगीकारणे आवश्यक आहे. त्यामुळे शेती व्यवसायांची उन्नती होऊ शकेल. स्वयंपूर्ण होण्यासाठी जैवीक शेतीचा वापर केल्यास उत्पादनाची क्षमता वाढेल. स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारीत परिणामकारक संशोधन व विकास केंद्र म्हणून कार्य करताना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने जैवीक तंत्रज्ञान व विज्ञान प्रशाळेद्वारे जौवीक कीटकनाशकांचे संशोधन आणि उत्पादन तसेच बहुतेक सर्व तृणधान्य कडधान्य पिकांकरिता व इतर रोपांच्या लागवडीकरिता तसेच नापीक आणि ओसाड जमिनीची सुपीकता वाढविण्याकरीता जैवीक खतांचा विकास आणि निर्मिती ग्रामीण आदिवासी व नागरी क्षेत्राकरिता जैव तंत्रज्ञानावर आधारीत साधन सामग्री तयार करुन अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. याशिवाय लहान व मध्यमवर्गीय शेतकरी, शास्त्रज्ञ, संशोधक, शासकीय अधिकारी यांना स्वदेशी जैविक तंत्रज्ञानावर आधारीत प्रशिक्षणाद्वारे आपल्या मायबोलीद्वारे माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याचबरोबर वैधानिक परिसंवाद, गटचर्चा परिसंवादाचे आयोजन या विस्तार कार्यक्रमाअंतर्गत शेतकऱ्यांकरीता तसेच सर्वसामान्य जनतेकरीता कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय पाण्याचे जमिनीच्या मातीचे तसेच अन्नाच्या नमुन्यांचे सूक्ष्म जीवशास्त्रीय आणि रासायनिक पृथ:करण तसेच मानवी रोगप्रतिकारक जिवाणूचे परिक्षण करुन त्यांचे जौविकरित्या नियंत्रण व उपयोगाचे विधायक आणि वौधानिक व्यवस्थापन तंत्र विकसित करण्यात आले आहेत. पर्यावरणाचा नौसर्गिकरित्या तोल सांभाळून स्वदेशी जैविक तंत्रज्ञानाचा योग्यप्रकारे वापर करुन नवीन शतकामध्ये सर्वसामान्य जनतेला आणण्याचे आव्हान खान्देशसारख्या मागास भागात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने स्वीकारले आहे.

# सामाजिकशास्त्र रोजगार व व्यावसायभिमुख

सामाजिकशास्त्रांमध्ये नौकरीसाठी प्रयत्न करणाऱ्या तरूणांसाठी आता सुगीचा काळ येणार आहे. उमवितील सामाजिकशास्त्र प्रशाळेअंतर्गत असलेल्या असभ्यासक्रमांची पुर्नरचना व्यावसायभिमुख व रोजगारीभिमुख करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मा. कुलगुरु प्रा. डॉ. सुधीर मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली एम. ए. सामाजिकशास्त्रातील विविध विषयांची नव्याने मांडणी व बांधणी करण्यात आली असून देशभरातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. अभ्यासक्रमांचा समतोल प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने कसा आवश्यक आहे. राष्ट्रीय विकासाशी त्यांचे नाते जोडण्यात आले आहे. परिपूर्ण व सखोल अभ्यासक्रमांची पुनर्रचना करण्यात आली आहे. सामाजिकशास्त्र प्रशाळेतील अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, एम.एस.डब्ल्यू, स्त्री अभ्यास केंद्र, समाजशास्त्र, आंबेडकर थॉटस आदी विषयांना रोजगारीभिमुख करण्यात आले आहे. वैद्यकीयशास्त्र व अभियांत्रिकी शास्त्राप्रमाणे नवी पिढी सामाजिकशास्त्र विषयात करीअर करु इच्छित आहे. येणाऱ्या काळात या शाखेला नवी संजीवनी मिळू शकेल. यामुळे आर्थिक विश्लेषक, बॅकिंग, अर्थतज्ज्ञ निर्माण होऊ शकतील. अर्थशास्त्रात अनेक करीअरच्या संधी उपलब्ध होतील. एका आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अहवालानुसार बजेट ॲनालिस्ट च्या पदासाठी २०१० ते २०२० या दशकात १० टक्के नवीन जागा तयार होतील. बजेट ॲनालिस्टची संख्या कमी असल्यामुळे त्यांना पगार ही चांगला मिळेल. केडिट सिस्टम परीक्षा पध्दतीमुळे उमवितील विद्यार्थी इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकेल. गणित, इंग्रजी, अर्थशास्त्र, पत्रकारिता, संगणकशास्त्र या विषयाची माहिती असणे गरजेचे आहे. इंटरनेटच्या प्रवेशामुळे सामाजिकशास्त्रांचे रुप-स्वरुप बदलत आहे. संगणक शास्त्रातील विद्यार्थ्यांप्रमाणे सामाजिकशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देणे अनिवार्य

झाले. त्यामुळे त्यांना रोजगारांच्या संधी मिळतील. सामाजिक शास्त्र प्रशाळे अंतर्गत सर्व अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली जात आहेत. त्यामुळे सामाजिकशास्त्र प्रशाळेतील प्रवेश संख्या वाढीस लागेल. नव्या शैक्षणिक वर्षापासून आणि मोडी विषयाचे लिपी प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर मानसशास्त्र व तत्वज्ञान हे दोन अभ्यासक्रम विषय सामाजिकशास्त्र प्रशाळेत सुरु होणार आहेत. तसेच मानवविद्या व कला प्रशाळेअंतर्गत पत्रकारिता व जनसंवाद, संरक्षण व सामरिकशास्त्र, संगीतशास्त्र विषयांच्या अभ्यासक्रमांची पुर्नरचना रोजगाराभिमुख करण्यात आली आहे. संरक्षण व पत्रकारिता, संगीत, कला क्षेत्रात करीअरच्या मोठया प्रमाणात नव्या संधी उपलब्ध आहेत. हे सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रम हे सामाजिकशास्त्र विद्याशाखेत येतात. सामाजिक शास्त्र विद्याशाखेतील सर्व अभ्यासक्रम व्यवसायाभिमुख व रोजगाराभिमुख करण्यात आले आहे यांचे श्रेय मा.कुलगुरु महोदय डॉ. सुधीर मेश्राम यांच्याकडे जाते. सामाजिकशास्त्र विषयातील विद्याशाखामधील अभ्यासक्रमांना आता सुगीचे दिवस येणार आहे यात संदेह नाही.

# नेट -सेटला सामोरे जातांना

संतोष खिराडे
सहाय्यक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विभाग

नेट व सेट परीक्षला अनेक विद्यार्थी बसतात.या परीक्षेच्या निमित्याने मी सुद्धा परीक्षा केंद्रावर परीक्षा देण्यासाठी अनेकदा गेलो व परीक्षेला बसलो.त्यावेळी अनेक विद्यार्थ्यांशी संवाद साधला.त्या पैकी अनेक विद्यार्थ्यांचे मते जाणवतात ती अशी,जसे एक विद्यार्थी दुसऱ्या विद्यार्थ्याशी संवाद सांधताना म्हणतो की, अरे मी काही पास होणार नाही पण चला देवुन पाहू म्हटल परीक्षा, दुसरा अरे मी देखिल परीक्षेच स्वरूप कस असत हे पाहण्यासाठीच बसलोय परीक्षेला, तिसरा अरे माझी ही आठवी वेळ आहे परीक्षा देण्याची पण केवळ थोडयाच गुणांनी मी पास होत नाहीये.चौथा अरे ममाझाही अभ्यास काही झाला नाही रे अशी विधाने सहजतेने आपल्या कानावर पडतात.कदाचित तुमच्या पैकी अनेकांनी हा अनुभव घेतलेला असेलही. तसेच सर्व पेपर सोडवुन बाहेर आलेले विद्यार्थ्यांपैकी अनेक जन संवाद सांधतात तो असा,अरे पेपर खुप अवघड होता वा अरे पहिला व तिसरा पेपर सोपा होता परंतु दुसरा पेपर मला अवघड गेला यार । अरे मला तिसरा पेपर अवघड गेला असे उद्‌गार तुम्हाला ऐकायला येतील.कदाचित तुम्ही हा अनुभव घेतला असेलही पण या सर्व विद्यार्थ्यांनी कधी असे म्हटले का की अरे मी पास होणारच । अभ्यासपूर्ण पेपर मी सोडवला.किंवा मी पास होण्यासाठीच ही परीक्षा देतोय । सांगायचे तात्पर्य असे की सेट वा नेट परीक्षेला बसणारा विद्यार्थी हा पुर्ण तयारीनेच व सकारात्मक वृत्तीने परीक्षेला सामोरे गेला तर नक्कीच यश मिळेल.मला आलेल्या स्व अनुभवातुन मी या लेखात नेट वा सेट परीक्षेला तुम्ही कसे सामोर जावे जेणे करून तुम्हाला यश मिळेल या सदर्भात काही बाबीचा उहापोह सदरील लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.लेख वाचुन नक्की विचार करा.यश तुमच्या हाती आहे.

**सेट वा नेट परीक्षा म्हणजे काय ?**

सहाय्यक प्राध्यापक या पदाकरीता पात्र ठरण्यासाठी नेट वा सेट या पैकी कोणतीही एक परीक्षा पात्र व्हावे लागते.नेट म्हणजे नॅशनल इलिजीबीलीटी टेस्ट अर्थात राष्ट्रीय पात्रता परीक्षा जी राष्ट्रीय पातळीवर घेतली जाते. तर सेट म्हणजे राज्य पात्रता परीक्षा होय.नेट परीक्षा ही विद्यार्थ्याला सहाय्यक प्राध्यापक या पदाकरीता पात्र होण्यासाठी वा म्हणजे यु.जी.सी. कडुन फेलोशिप मिळविण्यासाठी देता येते.पात्र झालेला विद्यार्थी देशभर कुठेही ज्या विषयामध्ये तो पास झाला आहे त्या विषयाकरीता सहा.प्राध्यापक या पदासाठी पात्र असतो.मात्र सेट या परीक्षेते पात्र विद्यार्थी हा प्रामुख्याने महाराष्ट्र व गोवा पुरताच पात्र असतो.नेट ही परीक्षा राष्ट्रीय स्तरावरील असल्यामुळे या परीक्षेच माध्यम हे भाषा विषयाचा अपवाद वगळता केवळ इंग्रजी व हिंन्दी असते.सेट परीक्षेचे माध्यम भाषा विषयाचा अपवाद वगळता मराठी व इंग्रजी असते.

**सेट वा नेट पात्रता:**

अनेक विद्यार्थी असे विचारतात की ही परीक्षा केव्हा देता येते ? हया प्रश्नाचे उत्तर म्हणजे तुम्ही ज्या विषयात पदव्युत्तर पदवी (एम.ए.,एम.कॉम.,एम.एस्सी) पुर्ण केले आहे किंवा करत आहात अशा विषयात पदव्युत्तर पदवी च्या दुसऱ्या वर्षा पासुन म्हणजे ॲपीअर असताना देखिल त्या त्या विषयात विद्यार्थी परीक्षेला बसु शकतात.

**सेट वा नेट परीक्षेचे स्वरूप :-**

नेट व सेट ही परीक्षा साधारत: एका दिवसाची पात्रता परीक्षा आहे.एकूण तीन पेपर या परीक्षेत असतात.परीक्षेत असणारे पेपर वा गुण खालील प्रमाणे आहेत.

विभाग पेपर एकुण गुण प्रश्न संख्या कालावधी अनुक्रमे पुढील प्रमाणे

पहीला १- १००, एकूण ६० वस्तुनिष्ठ प्रश्न त्यापैकी कोणतेही ५० सोडवायचे आहेत. १ तास १५ मिनिटे

पहीला२-१००एकूण ५० वस्तुनिष्ठ प्रश्न सर्व प्रश्न अनिवर्य १ तास १५ मिनिटे

दुसरा ३ -१५० एकूण ७५ वस्तुनिष्ठ प्रश्न सर्व प्रश्न अनिवर्य २ तास ३० मिनिटे

**पेपर १ ला :** सेट वा नेट साठीचा पहीला पेपर हा सर्व विषयासाठी समान असतो.म्हणजे सर्व विषयासाठी पेपर पहीला हा अनिवार्य पेपर आहे.या पेपर मध्ये एकूण साठ प्रश्न विचारले जातात.पेपर साठी स्वतत्र असा अभ्यासक्रम देण्यात आला आहे.हा पेपर केवळ सामान्य ज्ञानावर आधारीत नाही तर हा पेपर विद्यार्थ्याच्या अध्यापन व संशोधन अभियोग्यतेचे मूल्यमापन करणारा आहे. या पेपर च्या अभ्यासक्रमात एकूण दहा उप विभाग असुन त्यावर साधारणत:पत्येक विभागावर सहा प्रश्न विचारले जातात.हया पेपरचे उप विभाग म्हणजे १.अध्यापन अभियोग्यता २.संशोधन अभियोग्यता ३.वाचन क्षमता ४.संप्रेषण,५.कारणमिमांसा () ६.तार्किकता वा तार्किक क्षमता ( ) ७.माहीतीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन,८.आय.सी.टी ९.पर्यावरण १०.उच्च शिक्षण व प्रशासन हे होत.या साठी विद्यार्थ्यांनी मुळ अभ्यासक्रमाचे विश्लेषण करून त्या संदर्भात पुस्तकाचे वाचन, मनन,चिंतन करावे.

**पेपर २ रा :** पेपर दुसरा हा विद्यार्थ्यांनी जो विषय सेट वा सेट साठी निवडला आहे त्यावर पेपर दुसरा हा अवलबुन असतो.हया पेपर मध्ये एकूण ५० बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न हे ज्या विषयात विद्यार्थी परीक्षा देत आहे त्यावर आधारीत हा पेपर असतो.या पेपर साठी स्वतत्र असा अभ्यासक्रम असतो.या पेपर ची तयारी करताना विद्यार्थ्यने पाठयक्रम व्यवस्थीत रित्या अभ्यासावा.साधारणत: हा पेपर पदव्युत्तर पदवीला अभ्यासलेल्या सर्व विषयावर आधारीत असतो.पाठयक्रमातील प्रमुख मुद्दे संकल्पना,आशय लक्षात घेवुन त्यासंबधी मुद्देसुद नोट्स काढाव्यात.आशयातील सर्व संकल्पनाचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यास हा पेपर सहज तेने सोडविता येईल.

पेपर ३ रा :पेपर ३ रा हा १५० गुणाचा असतो.एकूण ७५ प्रश्न या पेपर मध्ये विचारले जातात.प्रत्येकी दोन गुण या प्रमाणे प्रश्न असतात. प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय दिलेले असतात.याही पेपर करीता स्वंतत्र असा अभ्यासक्रम दिलेला आहे. विचारलेले सर्व प्रश्न हे केवळ ज्ञानात्मक पातळीचे नसतात. तर हे पश्न प्रामुख्याने ज्ञान, आकलन, उपयोजन,संश्लेषण ,विश्लेषण व मूल्यमापन यावर आधारीत असतात.हा पेपर सोडविण्यासाठी अडिच तासाचा वेळ दिलेला असतो.

परिक्षार्थी विद्यार्थ्यांना पडणारे काही प्रश्न : सर्व साधारण सर्वच विद्यार्थ्यांनी सेट वा नेट संदर्भात खालील प्रश्न हे पडलेले दिसतात.ते म्हणजे अभ्यास कसा करावा ? किती वेळ करावा ?पुन्हा पुन्हा परीक्षा देवुन मी पात्र होत नाही काय करावे ?,परीक्षा खुपच अवघड आहे ?,थोडया गुणानी मी पास होवु शकलो नाही काय करावे ?पहिला व दुसरा पेपर सोपा गेला परंतु तिसरा पेपर कठीण गेला काय करावे ?, दुसरा पेपर अवघड गेला काय कर्िं?अभ्यासाची सुरवात नेमकी कशी कर्िं?,कोणती पुस्तके वाचावीत ?, नोट्स कुठे मिळतील ? इत्यादी. हे सर्व प्रश्न विद्यार्थी वांरवांर विचारताना दिसतात.परंतु या प्रश्नाची उत्तरे मिळविण्याचा प्रत्यन हा स्वत: विद्यार्थ्यांनी केला पाहीजे.कारण आता आपण पदव्युत्तर पातळीवरचे विद्यार्थी आहोत.व आपणास व्याख्यात बनायचे आहे.

**सेट वा नेट परीक्षा तंत्र आणि मंत्र :-**

विद्यार्थी मित्रहो । तुम्ही सेट वा नेट परीक्षेत पात्र ठरू शकता त्यासाठी काही तंत्रे दिली आहेत वाचा व आत्मसात करून या परीक्षाची तयारी करा बघा यश तुमच्या पासून अगदी जवळ आहे.

**१. सकारात्मक वृत्ती :-**आपणास सेट वा नेट परीक्षा पात्र व्हावयाचे आहे. तेव्हा मी पास होणारच या सकारात्मक वृत्ती ठेवुन परीक्षेची तयारी करा. मला पास व्हावयाचेच आहे अशी पुर्ण मानसिक तयारी करणे हे तुमच्या यशाची सुरूवात आहे.

**२. लवकर सुरूवात :-** अनेक विद्यार्थी हे पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर सेट वा नेट च्या तयारीला लागतात. पंरतु या विद्यार्थ्यानी हे लक्षात घेतले पाहीजे कि,सेट वा नेट ही परीक्षा बहुताश: तुमच्या पदव्युत्तर अभ्याक्रमावरच आधारीत आहे. तेव्हा या परीक्षेची तयारी करतांना जर पदव्युत्तर पदवीच्या प्रथम वर्षापासूनच केली तर तुम्हाला सहजतेने यश मिळेल.

**३.अभ्यासक्रम नेहमी जवळ ठेवा :**

परीक्षेची तयारी अनेक विद्यार्थी करतात पंरतु काहीच विद्यार्थी यश मिळवितात असे का ? तर त्याची अभ्यासाची दिशा बऱ्याचदा चुकते याचे कारण अभ्यासक्रमाकडे होणारे त्याचे दुर्लक्ष हे होय.या परीक्षेची तयारी करताना तुम्ही तुमच्या जवळ मराठी,हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेतील अभ्यासक्रम नेहमी तुमच्याजवळ ठेवावा. अभ्यासक्रमाच्याच सुरवातीला बारकाईने अभ्यास करावा.अभ्यासक्रमातील मुद्दे व उपमुद्दे लक्षात घ्यावेत.अभ्यासक्रमातील आशयाचे विश्लेषण करावे.आपणास माहीत असणरे व नसणारे घटक जाणून घ्यावेत.हे लक्षात घ्यावे की परीक्षेत विचारले जाणारे सर्व प्रश्न हे अभ्यासक्रमावरच विचारले जातात त्यामुळे आपणास अभ्यासाची दिशा मिळते.

**४.प्रश्नपत्रिकाचे विश्लेषण करा :-**

मागील वर्षाच्या प्रश्नपत्रिका देखिल आपणास सेट वा नेट परीक्षेची पूर्वतयारी करताना उपयुक्त ठरतात नेट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका हया नेट परीक्षेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या वेब साईट वर्नि आपणास त्या डाउनलोड करून घेता येतात.मागील प्रश्नपत्रिकाचे विश्लेषण कर्नि विचारलेल्या प्रश्नाचे स्वरूप आपल्या लक्षात येते.मागील प्रश्न मात्र केव्हाही पुन: विचारला जात नाही.परंतु आपणास त्यावरून विचारलेले प्रश्न व विचारला जाणारा प्रश्न या विषयी अंदाज नक्की बाधता येतो.प्रश्नपत्रिका विश्लेषणामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाची दिशा मिळते.

**५. नोट्स काढणे वा मुद्दे तयार करणे :-** अभ्यासक्रमानुसार मुद्देसुद नोट्स काढणे हे या परीक्षेसाठी नक्की उपयुक्त पडते.बाजारात देखिल नोट्स उपलब्ध असतात.परंतु अभ्यासक्रमानुसार सर्व मुद्देनूरूप स्वत: नोट्स तयार केल्यास स्मरणात राहणे देखिल सोपे जाते.अभ्यासक्रमातल सर्व मुद्दे पूर्ण होतील अशा नोट्स काढाव्यात त्यासाठी आपल्या पदव्युत्तर पदवीला अभ्यासलेली विविध संदर्भ पुस्तके ही उपयोगी पडतात.त्या नुसार प्रत्येक मुद्दयानुसार नोट्स तयार कराव्यात. विद्यार्थी मित्रहो सेट वा नेट परीक्षा नक्कीच अवघड नाही. परंतु गरज आहे ती सकारात्मक वृत्तीने तयारी करून परीक्षेला समोर जाण्याची एकदा संपुर्ण तयारीनीशी परीक्षा देवुन बघा वरील प्रमाणे तयारी करा बघा नक्की यश मिळेल परीक्षेसाठी शुभेच्छा !

# म. फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध उपक्रम




**महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित रक्तदान शिबीरात रक्तदान करतांना प्रा. लभाने सोबत कुलगुरू डॉ. सुधीर मेश्राम, डॉ. व्ही.एल. माहेश्वरी, डॉ. अरविंद चौधरी, प्राचार्य डॉ.डी. आर. पाटील, डॉ. डी.जी. हुंडीवाले, रमेश शिंदे, डॉ. आर.एच. गुप्ता, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, डॉ. एस.जी. नारखेडे, डॉ. पंकजकुमार नन्नवरे, राजू सोनवणे, अरूण सपकाळे.**

जळगाव– उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त किशोर वाघ आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे गीत गायन,रक्तदान शिबीर असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १०.३० वाजता अधिसभा सभागृहात औरंगाबादचे किशोर वाघ आणि त्यांचे सहकारी यांचा महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्र गायनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. वामनदादा कर्डक यांच्या रचना त्यांनी सादर केल्या. त्यांच्या गायनाने वातावरण भारावून गेले. यावेळी कुलगुरु प्रा.सुधीर मेश्राम, कुलसचिव प्रा.ए.एम.महाजन, प्रा.म.सु.पगारे, प्रा.आर.जे.रामटेके, प्रा.अनिल डोंगरे, राजू सोनवणे, अरुण सपकाळे आदी उपस्थित होते.या कार्यक्रमात विद्यार्थी, कर्मचारी, शिक्षक यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य प्रतिमा भेट दिली. ही प्रतिमा कुलगुरुंकडे सोपविण्यात आली. दुपारी रक्तदान शिबीर घेण्यात आले.इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात ७० पेक्षा अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी कुलगुरु प्रा.सुधीर मेश्राम, बी.सी.यु.डी.संचालक प्रा.डी.जी.हुंडीवाले, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्रा.डॉ.अरविंद चौधरी, प्राचार्य डी.आर.पाटील, प्रा.आर.एच.गुप्ता, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे प्रसन्नकुमार रेदासनी, श्री.जी.टी. महाजन, डॉ.श्रध्दा महाजन, प्रा.लभाण,डॉ.शांताराम नारखेडे, डॉ.पंकजकुमार नन्नवरे आदी उपस्थित होते. विद्यापीठातील आंबेडकर विचारधारा, बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, गौतम बुध्द अध्ययन व संशोधन केंद्र, महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्र आणि फुले-शाहू-आंबेडकर विचार मंच, विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# संशोधकांना फुलब्राईट फेलोशिप उपयुक्त– निकारजे



**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या लाईफ सायन्सेस विभागात आयोजित कार्यक्रमात बोलतांना सचिन निकारजे.**

जळगाव– अमेरिका आणि भारत सरकार यांच्या विद्यमाने दिल्या जाणाऱ्या नेहरु फुलब्राईट फेलोशिप संदर्भात बुधवारी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लाईफ सायन्सेस विभागात युनायटेड स्टेट- इंडिया एज्युकेशन फौंडेशनचे मुंबई येथील समन्वयक सचिन निकारजे यांचे व्याख्यान झाले.

श्री.निकारजे यांनी फुलब्राईट- नेहरु शिष्यवृत्ती बद्दल सविस्तर माहिती दिली. भारतात विविध क्षेत्रातील पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी तसेच शालेय शिक्षक अशा विविध घटकांसाठी अमेरिकेत जाऊन अभ्यास / संशोधन करण्यासाठी शिष्यवृत्ती मिळू शकते असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विद्यार्थी व प्राध्यापकांच्या शंकांचे निरसन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बी.सी.यु.डी.संचालक प्रा.डी.जी.हुंडीवाले होते. प्रशाळेचे संचालक प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी प्रास्ताविक केले. डॉ.अरुण इंगळे यांनी आभार मानले.

**सहकार्य**
संदीप केदार
निलेश पाटील
शैलेंद्र पाटील
संजू पाटील
राजू पाटील
सुनिल रडे
राहूल शिरसाळे
जनसंवाद आणि पत्रकारिता विभाग व जनसंपर्क विभाग



उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या संचालकपदाची सूत्रे कुलसचिव प्रा.ए.एम.महाजन यांच्याकडून स्विकारतांना प्रा. सत्यजीत साळवे.

# विद्यार्थी कल्याण विभागाच्या संचालकपदी प्रा.साळवे

जळगाव – उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक म्हणून प्रा.सत्यजित साळवे यांनी पदभार स्वीकारला.

यापूर्वी डॉ.पंकजकुमार नन्नवरे हे संचालक म्हणून काम करीत होते. त्यांची मुदत संपल्यामुळे प्रा.सत्यजित साळवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रा.साळवे जळगावच्या डॉ.अण्णासाहेब जे.डी.बेंडाळे महिला महाविद्यालयात सहायक प्राध्यापक कार्यरत आहेत. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रा.साळवे यांनी शहरात काम केले आहे. इ.५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय स्पर्धा परीक्षेचे लक्ष्य आय.ए.एस.चे आयोजन त्यांनी केले. याशिवाय ११ वी ते पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी जिज्ञासा स्पर्धा परीक्षेचे राज्यस्तरीय आयोजन त्यांनी केले. बार्टीमार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी देखील त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करुन घेतली. जवळपास २७ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध झाली. स्पर्धा परीक्षांच्या संपादीत ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. कार्यशाळा, चर्चासत्र यामध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असतो. कुलगुरु प्रा.सुधीर मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कल्याणाच्या विविध योजना व उपक्रम समर्थपणे राबविण्याचा संकल्प त्यांनी यावेळी केला. प्रा.साळवे यांनी कुलसचिव प्रा.ए.एम.महाजन यांच्याकडून पदभार स्वीकारला.

पान १ वरून

## कोनशिलेचा अनावरण

१००आणि २०० विद्यार्थ्यांसाठी क्षमतेची बैठक व्यवस्था,ई सुविधा केंद्र, विद्यार्थी कल्याण केंद्र, १०० जणांच्या क्षमतेचे भोजन कक्ष, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यालय, विद्यार्थी पदाधिकाऱ्याचे कार्यालय, प्रतिक्षा कक्ष, संगणकीय, इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या १५० मुला मुलींची व्यवस्था करण्यात येणार आहे. इमारतीच्या पहिल्या मजल्यावर परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज खोल्या बांधण्यात येणार आहे अशी माहिती कुलगुरू डॉ. सुधीर मेश्राम यांनी दिली.

## महाविद्यालयीन गुणवत्ता...

डॉ. गौरी मिलिंद राणे अध्यक्ष धुळे जिल्हा समितीचे कार्यक्षेत्र साक्री व धुळे. डॉ. अरविंद नारायण चौधरी अध्यक्ष नंदूरबार जिल्हा शहादा, नंदूरबार, नवापूर.प्रा. डॉ. आर. एच.गुप्ता अध्यक्ष समितीचे कार्यक्षेत्र व्यवस्थापनशास्त्र जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हा. या तिनही जिल्हातील संलग्नीत महाविद्यालये व प्रशाळा अंतर्गत परिसंस्था यांची गुणवत्ता व नियंत्रण समिती पाहणी करण्यात येत असून या संदर्भातील अहवाल विद्यापीठाकडे पाठविले जात आहे अशी माहिती उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.ए.एम.महाजन यांनी दिली.

# लाईफ सेव्हर क्लबची स्थापना

जळगाव– उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि इंडियन रेडक्रॉस सोसायटी – लाईफ सेव्हर क्लब स्थापन करण्याचा निर्णय घेऊन विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने सामाजिक बांधिलकीचे एक नवे पाऊल उचलले.

कुलगुरु प्रा.सुधीर मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. या बैठकीत उमवि आणि रेडक्रॉस लाईफ सेव्हर क्लब स्थापनेबाबत चर्चा झाली. मलेरिया, डेंग्यू, कर्करोग या सारख्या आजारांवरा शरीरातील प्लेटलेटचे प्रमाण वाजवी पेक्षा कमी होऊन जिवीतहाणीची शक्यता असते. अशा वेळी रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी विद्यापीठ स्तरावर रक्त बिंबीका प्लेटलेट दात्यांचा लाईफ सेव्हर क्लब स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये क्लबच्या सदस्यांची नियुक्ती करुन त्यांची यादी दरवर्षी अद्ययावत केली जाणार आहे. या बौठकीत सामाजिकशास्त्र प्रशाळेतील इतिहास विभागात मोडीलिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याचा तसेच वस्तुसंग्रहालयशास्त्र प्रमाणपत्र हा अभ्यासक्रम १५ दिवसांऐवजी ३० दिवसांचा सुरु करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.



उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात मतदार जनजागृती अभियानांतर्गत विद्यापीठात कुलगुरू डॉ. सुधीर मेश्राम आणि इतर प्राध्यापक, अधिकारी व विद्यार्थ्यांकडून संकल्पपत्र भरून घेतांना कॅम्पस ॲम्बेसेडर लक्ष्मण पाटील.

# वैद्यकीय अधिकारी नारखेडेंचा सेवानिवृत्तनिमित्त सत्कार



उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. एस.जी. नारखेडे यांचा सेवापूर्ती निमित्त सत्कार करतांना कुलगुरू डॉ. सुधीर मेश्राम. सोबत कुलसचिव डॉ.ए.एम.महाजन, एस.पी.राठोड, वाय.डी.वाघमारे, अरूण पाटील, फुलचंद अग्रवाल, राजू सोनवणे, अरूण सपकाळे, अशोक पाटील, चंद्रकांत पाटील, महेंद्र महाजन, निळकंठ पाटील आदी.

जळगाव -उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील वौद्यकीय अधिकारी डॉ.शांताराम नारखेडे हे विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त झाले. कुलगुरु प्रा.सुधीर मेश्राम यांच्या दालनात डॉ.नारखेडे यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. कुलगुरुंच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन त्यांच्या सेवेचा गौरव करण्यात आला. डॉ.नारखेडे यांनी १६ वर्षे विद्यापीठाची सेवा केली. या निरोप समारंभ प्रसंगी कुलसचिव प्रा.ए.एम. महाजन तसेच विद्यापीठा तील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मागासवर्गीय कर्मचारी संघटना, पतपेढी यांच्या वतीनेही डॉ.नारखेडे यांचा सत्कार करण्यात आला.

# आईने बालपणातच आम्हाला दिले शिक्षणाचे धडे - कुलगुरू

**आयुष्याच्या प्रत्येक वळणावर मुलांना आई महत्त्वांची वाटते. आईच्या संस्कारातून प्रत्येक व्यक्तीला जगण्याचे धैर्य व शक्ती मिळते. मातृदिनानिमित्ताने उमविचे मा. कुलगुरु प्रा. सुधीर मेश्राम यांचे विचार...**

शाळेत जाताना जेवण करुन जाण्याची माझी सवय होती. यासाठी संपूर्ण वेळेचे नियोजन मात्र आईच करीत असे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आईने प्रत्येक क्षणाला माझी काळजी घेतली. मी स्वयंपाक घरात आईच्या शेजारी बसूनच अभ्यास करीत असे. तेव्हा भूक लागलेली असल्यामुळे आईजवळ वारंवार हट्ट करुन जेवण लवकर करण्याचे सांगत असे भुकेने व्याकुळ झालेल्या मुलाची भूक शमवण्यासाठी लगबगीने माझी आई भाकरी करायची अनेकदा तिला चटके बसायचे त्यांची जाणीव मला आता होते आहे. कोणत्याही क्षेत्रात आईच्या मायेने जबाबदारी पेलत असताना तिचे हे चटके आठवतात, प्रत्येकक्षणी आईसोबत असल्याची भावना मनात येते. आम्हा भावंडांना मोठे करण्यात आईने सोसलेल्या वेदना आता आठवतात. माझ्या आईचे शाळेतले नाव सुमनबाई तर घरातले सत्यभामा होते. तिचे शिक्षण आठव्या वर्गापर्यंत झाले होते. त्यामुळे तिला शिक्षणाचे महत्व माहित होते. आई गृहिणी होती तरी मुलांच्या शिक्षणासाठी ती आग्रही असायची. आम्ही राहत असलेल्या परिसरातील इतर मुलांनाही ती शिक्षणाचे महत्व सांगून सर्वांना शाळेत जाण्यासाठी प्रेरित करीत असे. शिका आणि मोठे व्हा, मोठे होण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, आईनेच बालपणातच आम्हाला दिले शिक्षणाचे धडे दिले होते. तसेच आईला कादंबरी वाचनाचीही सवय होती. त्यामुळेच तिने माझे नाव सुधीर ठेवले. त्या काळात पारंपारिक नावे ठेवली जात; पण आईने वाचन केलेले असल्यामुळे तिने मला सुधीर असे मॉर्डन नाव दिले. आमची परिस्थिती सामान्यच होती. त्या काळात शिक्षणावर भर देण्यापेक्षा इतर कामांमध्ये युवक गुंतून जात असत. मात्र, अशाही परिस्थितीत इतर चौनीच्या वस्तूंपेक्षा शिक्षणावर लक्ष केंद्रित करुन तिने आम्हाला वाढवले. शिकून मोठे झाल्यानंतर आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या फायद्यासाठी करा, असे आई नेहमी सांगत असे. आपल्याला मिळालेले ज्ञान हे इतरांना द्या, त्यामुळेच परिपूर्ण समाजनिर्मिती होते, असे तिचे ठाम मत होते. आठ वर्षापूर्वीच माझ्या आईने जगाचा निरोप घेतला; पण तिने सांगितलेल्या सगळया गोष्टी जशाच्या तशा माझ्या लक्षात आहेत.

**उमवि वार्ता वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी रू २५०/- मात्र चा धनादेश वित्त व लेखाधिकारी, उमवि, जळगाव यांचे नावे काढून जनसंवाद आणि पत्रकारिता विभाग, उमवि, जळगाव येथे जमा करावा.**



उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि राजीव गांधी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कमिशन यांच्यातील सामंजस्य करारावर स्वाक्षरी करतांना कुलसचिव प्रा.ए.एम.महाजन आणि ए.व्ही.सप्रे सोबत डॉ. अनिल काकोडकर, आर.एस. भादलीकर.



**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि जपान येथील तोकूशिमा विद्यापीठ यांच्यातील सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. सुधीर मेश्राम, प्रा. तोशिहिरो मोरीगा, डॉ. डी.जी.हुंडीवाले, डॉ. व्ही.एल. माहेश्वरी, प्रा.ए.एम. महाजन, डॉ. पंकज कोईनकर, एस.आर. भादलीकर.**

**पान १ वरून**

करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी समन्वयक डॉ.पंकज कोईनकर, बीसीयुडी संचालक डॉ.डी.जी.हुंडीवाले, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एल.माहेश्वरी उपस्थित होते. शिक्षण, क्रीडा आणि सांस्कृतीक मंत्रालय, जपान यांच्यातर्फे भारतीय विद्यापीठ आणि जपान मधील विद्यापीठ यांच्यात एकत्रितपणे संयुक्त शिक्षण अदान-प्रदान कार्यक्रमांतर्गत हा करार करण्यात आला आहे. या करारांन्वये तोकुशिमा विद्यापीठ आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ या दोनंही विद्यापीठातील विद्याथी, प्राध्यापक यांच्या उच्च शिक्षणाचे अदान-प्रदान करण्याचा संयुक्त प्रकल्प प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यानुसार या कराराचा एक भाग म्हणून दोन्ही विद्यापीठातर्फे ८ ते १० विद्यार्थी दर तीन महिन्याच्या कालावधीसाठी उच्च शिक्षणासाठी पाठविण्यात येणार आहेत. यात प्रामुख्याने माहिती तंत्रज्ञान, केमिकल, मेकॅनिकल, बायोटेक्नॉलॉजी, सिव्हील, आर्कीटेक्चर, आपत्ती व्यवस्थापन याविषयाचे विद्यार्थी सहभागी होवू शकणार आहेत. तसेच दोन्ही विद्यापीठातर्फे डबल डिग्री या संकल्पनेसोबतच पोस्ट ग्रॅज्युएट आणि पीएच.डी करण्यासाठी विद्यार्थी या दोन्ही विद्यापीठांमध्ये जावून शिक्षण पूर्ण करु शकतील.

जपान सरकारच्या विविध शैक्षणिक उपक्रमांतर्गत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील ५ विद्यार्थ्यांना तोकुशिमा विद्यापीठ,जपान येथे जुलै/ ऑगस्ट,२०१४ मध्ये एक महिन्याच्या कालावधीसाठी घ्समर स्कुल ट्रेनिंग प्रोग्रामङ साठी पाठविण्यात येणारआहे. यात विद्यापीठातील ३ (रसायनतंत्रज्ञान संस्थेतील दोन आणि जौवतंत्रज्ञानचा एक विद्यार्थी) व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयातील २ याप्रमाणे एकूण ५ विद्यार्थ्यांचा समावेश असेल. यासाठी लागणारा ५० ते ६० टक्के खर्च तोकुशिमा विद्यापीठ करणार आहे.

तोकुशिमा विद्यापीठ आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथील संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यात जपान शासनातर्फे संयुक्त संशोधन प्रकल्प राबविले जावू शकतात व त्या मार्फत संशोधक व प्राध्यापक यांचे सातत्याने अदान-प्रदान होऊन मर्यादित कालावधीत विद्यापीठाचा शैक्षणिक विकास साधला जाऊ शकतो.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात डिसेंबर २०१४ मध्ये होत असलेल्या ग्लोबल बायोटेक फोरम या आंतरराष्ट्रीय परिषदेकरीता तोकुशिमा विद्यापीठांचे प्रतिनिधी मंडळ यांना उपस्थितीचे निमंत्रण कुलगुरू प्रा.सुधीर मेश्राम,निमंत्रक प्रा.व्ही. एल.माहेश्वरी, कुलसचिव प्रा.ए.एम.महाजन यांनी दिले. प्रा.तोशिहिरो मोरीगा यांनी आमंत्रण स्वीकारले असून जास्तीत जास्त संशोधक विद्यार्थी तसेच प्राध्यापक सहभागी होतील असे आश्वासन त्यांनी दिले. गतवर्षी कुलगुरु प्रा.सुधीर मेश्राम यांनी व कुलसचिव प्रा.ए.एम.महाजन यांनी तोकुशिमा विद्यापीठाला भेट दिली होती. या भेटीत या कराराबाबत प्राथमिक चर्चा झाली होती. त्याचेच फलीत म्हणजे या करारावर शिक्कामोर्तब झाले. तंत्रज्ञानाचे हस्तातंरण, शैक्षणिक अदान-प्रदान, संशोधनातील नाविण्य या सोबतच आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होणार आहे. आदिवासी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या करारामुळे मोठी संधी प्राप्त होणार आहे.

# अमेरिकेच्या इनोसेन्टीव्ह तर्फे गोकूळ खैरनारचा सत्कार

जळगाव -उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या औषधी तंत्रज्ञान विभागातील संशोधक विद्यार्थी गोकुळ खैरनार याच्या संशोधनाला अमेरिकेच्या इनोसेन्टीव्ह या संस्थेने साठ हजार रुपयांच्या पुरस्काराने सन्मानीत केले आहे.

या संस्थेच्या वतीने विज्ञान आणि तंत्रज्ञानातील विविध नाविण्यपूर्ण संशोधनांना सन्मानीत केले जाते. जगभरात इनोसेन्टीव्ह ही संस्था प्रतिष्ठीत गणली जाते. गोकुळ आधार खौरनार हा विद्यापीठाचा औषधी तंत्रज्ञान विभागात रिसर्च फेलो म्हणून कार्यरत आहे. त्याने पशु खाद्यातील पोषक खनिजांचे रक्तातील प्रमाण वाढविण्याबद्दल नॅनो टेक्नालॉजीच्या साहाय्याने संशोधन केले आहे. त्याच्या या संशोधनाची दखल घेऊन या संस्थेने गौरव केला आहे. गोकुळ खौरनार यास विभागप्रमुख विनोद मोकळे, प्रा.जितेंद्र नाईक, प्रा.सत्येंद्र मिश्र आदींचे मार्गदर्शन मिळाले.

# लीना, आदिती देवयानी व जया प्रथम

जळगाव-उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणित विभागाच्यावतीने आठवडाभर आयोजित केलेल्या विविध उपक्रमाचा समारोप बीसीयुडी संचालक प्रा.डी.जी.हुंडीवाले यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी झालेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण झाले.

नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन, डिपार्टमेंट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी आणि राजीव गांधी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कमिशन यांनी सहकार्य केले होते. सकाळच्या सत्रात महाविद्यालयीन प्राध्यापका साठी कार्यशाळा घेण्यात आली. आयआयटी मुंबईचे माजी प्राध्यापक व रामानुजन मॅथमॅटीकल सोसायटीचे अध्यक्ष प्रा. रवी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. प्रसंगी प्रा. डी. जी. हुंडीवाले यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आली. प्रा. आर.एल. शिंदे, प्रा. एस. आर. चौधरी, प्राचार्य डॉ.एम.एम. पवार, डॉ. किशोर पवार मंचावर उपस्थित होते. यशस्वीतेसाठी डॉ.एच.एल. तिडके, डॉ.सी.टी.आगे डॉ. व्ही.यु. एदलाबादकर यांनी परिश्रम घेतले.स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे - पदव्युत्तरस्तर - प्रश्नमंजुषा - प्रथम लीना अग्रवाल (गणित विभाग, उमवि), द्वितीय -पूनम गुरुबक्षाणससी (मु.जे. महाविद्यालय), तृतीय रुबीना खान (मू. जे. महाविद्यालय), पोस्टर सादरीकरण - प्रथम-आदिती जैन (गणित विभाग, उमवि), द्वितीय - गायत्री जोशी (एसएसव्ही पीएस धुळे), तोंडी सादरीकरण - प्रथम -आदिती जैन (गणित विभाग, उमवि).पदवीस्तर प्रश्नमंजुषा- प्रथम देवयानी पटवारी (बेंडाळे महिला महाविद्यालय), द्वितीय - अकीब शेख (इकरा महा), तृतीय- स्वप्नील चौधरी (प्रताप महा. अमळनेर), पोस्टर सादरीकरण - प्रथम- जया रावलाणी (य.ना. चव्हाण महा. चाळीसगाव) द्वितीय- सुयोग शिंपी (झेड. बी. पाटील महा. धुळे) युवा शिक्षक - पोस्टर सादरीकरण - रुपेश मोरे ( कला, वाणिज्य व विज्ञान महा. बोदवड)



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र कुलगुरू डॉ. सुधीर मेश्राम यांच्या हस्ते ग्रंथालयाला भेट देतांना विद्यार्थी आणि कर्मचारी सोबत कुलसचिव डॉ. ए.एम. महाजन.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात काढण्यात आलेली मिरवणूक.






उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेतर्फे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलतांना प्रख्यात विचारवंत फादर फ्रान्सीस दिब्रीटो. सोबत व्यासपीठावर कुलगुरू प्रो. सुधीर मेश्राम, डॉ.आ.ह.साळुंखे,डॉ.अर्चना देगावकर, डॉ.ए.एस.पैठणे आदी.

उमवि वार्ता हे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाकरीता मुद्रक, प्रकाशक, संपादक विभागप्रमुख डॉ. तुकाराम दौड यांनी परेश प्रिंटर्स डी–८७, एम.आय.डी.सी. जळगाव येथे छापून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी विभाग, विद्यापीठ अथवा संपादक सहमत असतीलच असे नाही. दूरध्वनी –०२५७ २२५७४३६, २२५८००८. RNI - MAHMAR-36247/13/1/2010-TC.